## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये अपील क्रमांक 1194/2007.

श्री.दगडू प्रभु चव्हाण,
मु. संतोष ऑईल मिलचे मागे,
एम.आय.डी.सी. नं. 3, कुंभारी रोड,
शिवणी, ता. जिल्हा अकोला. ..... **अपीलकर्ता**

**विरूध्द**

श्री.एच.पी.तुम्मोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अप्पर जिल्हाधिकारी, अकोला.

श्री. तेजुसिंग पवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी,
ता. जिल्हा अकोला. ..... **उत्तरवादी**

### निर्णय

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.11.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक 13.3.2008 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री.जितेंद्र लठ्ठा, वकील हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2005 रोजी माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचेकडे एलएक्यू 47/8/1973–74 केसची नक्कल पुरविण्याबाबत व केसमध्ये कोणता आदेश केला याबाबत वरील केसचा अवार्डबाबत नोटीसची नक्कल पुरविणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

... 2

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक 2.11.2005 रोजी अर्जामध्ये नमुद केलेले प्रकरणाची मुळ नस्ती मा.जिल्हाधिकारी, अकोला यांचेमार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेली आहे. कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष/शिरस्तेदार/कावि/4090/2004, दिनांक 20.12. 2004 नुसार सादर केलेली नस्ती अद्याप या कार्यालयात परत प्राप्त झालेली नसल्याने आपणास अपेक्षित असलेली माहिती त्र्ुर्त उपलब्ध करून देता येणार नाही असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. मात्र सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 10.10.2006 रोजी प्राप्त दिनांक 1.11.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक 10.10.2006 रोजी सदर्हु अर्ज घेण्यास आपल्या कार्यालयाने नकार दिल्यामुळे मी हा अर्ज पंजीबध्द डाकेने पाठवित आहे असा शेरा अपीलकर्ता यांनी दिलेला आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक 12.12.2006 रोजी देण्यात येवून उपरोक्त विषयानुसार आपण या कार्यालयात दाखल केलेल्या अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी, अकोला यांचे या संदर्भातील रेकॉर्ड मागविले असता आपणास त्यांनी दिनांक 2.11.2005 रोजी पत्र देवून उपरोक्त रेकॉर्ड हे शासनास पाठविल्याचे कळविले आहे. परंतु हे रेकॉर्ड त्यांना परत प्राप्त झाले आहे. करिता आपणास पाहिजे असलेली माहिती ही त्यांचेकडून नक्कल विभागामार्फत प्राप्त करून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे प्रथम अपीलाचे निर्णयापूर्वीच दिनांक 10.11.2006 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांचे अर्जाचे अनुषंगाने जी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे ती अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे आहे. विहित मुदतीत उपलब्ध करून दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे वकील यांचे म्हणणे असे आहे की, शासनाकडे नस्ती पाठविली होती तरी त्या नस्तीतील कागदपत्रे मागवून ती उपलब्ध करून देण्यास हरकत नव्हती. त्या

नस्तीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांच्या स्वतःपुर्तीच नस्ती दिसत नाही तर त्यात इतरही खातेदारांची नस्ती असल्यामुळे शासनाकडून पुन्हा माहिती मागविणे हे अव्यवहार्य ठरले असते. माहिती मागतांना सुध्दा एलएक्यू 47/8/1973–74 केसची नक्कल पुर्णपणे मागितलेली दिसते व त्यामुळे त्या संदर्भातील खर्चाचा अंदाज हा कार्यालयात करणे सुध्दा शक्य नव्हता. जे उत्तर दिलेले दिसून येते त्या उत्तराचे संदर्भामध्ये नोटशिटवर टिपणी केलेली आहे व त्यावर अपीलकर्ता यांचीपण सही दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता यांनी दिनांक 10.10.2006 रोजी प्राप्त दिनांक 1.11.2006 रोजी असे प्रथम अपील दाखल केलेले असून सुध्दा पुन्हा दिनांक 5.12.2005 रोजी माहितीचा अर्ज दाखल केलेला दिसून येतो व त्याबाबतही नोटशिटवर माहिती अधिकारी यांनी टिपणी केलेली दिसून येते. सदरची टिपणी ही दिनांक 20.12.2005 रोजीची आहे. त्यामुळे पुन्हा प्रश्न असा उपस्थित होतो की, प्रथम अपील हे दिनांक 26.10.2005 च्या संदर्भात आहे किंवा दिनांक 5.12.2005 ला अर्ज केल्याचे विरूध्द आहे याबद्यल निश्चित ठरविता येत नाही. प्रथम अपीलाचा दिनांक 13.12.2005 ची प्रत पाठविलेली आहे असे नमुद केलेले आहे. सदरच्या निर्णयाची प्रत नस्तीमध्ये दाखल केलेली नाही. दिनांक 7.5.2005 रोजी उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी, अकोला यांनी सदरच्या प्रकरणाबद्यल मुळ प्रकरणात एलएक्यू 47/8/1973–74 वरील प्रकरणात निवाडयामधील कास्तकाराने मोबदला मागणीचा अर्ज केलेला आहे. मोबदला दिला आहे. परंतु अर्जदाराने स.नं. 58 मधील अर्जित केलेल्या जमीनीमधून 12 घरे, 3 विहिरी व 500 झाडे अर्जित केली होती याबाबत मोबदला मागणीचा दावा केला आहे. याबाबत मुळ प्रकरण तपासणी केली असता अर्जदाराची जमीन रा.मा.क. 29/47/1976–1977 मौजे शिवर, ता.जि.अकोला या प्रकरणात अर्जदाराने 6900/–रूपये विशेष भूमि संपादन अधिकारी (सामान्य) अकोला यांनी मोबदला दिनांक 17.3.1978 मध्ये दिला होता. परंतु रा.मा.क्र.29/47/1976–1977

मौजे शिवर, ता.जि.अकोला या प्रकरणाचा संबंध एलएक्यू 47/8/1973–74 शिवर, ता. अकोला या प्रकरणाचा असल्यामुळे संबंधित अर्जदाराचे सर्व कागदपत्रे आपले कडे पाठविण्यात येत आहे. करिता आपलेकडे असलेले मुळ प्रकरण एलएक्यू 47/8/1973–74 शिवर हे मुळ प्रकरणावरून अर्जदाराचे निरासन करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल कळविण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. अर्थातच सदरचे पत्र माहितीचा अधिकारा अंतर्गत येत नाही. परंतु माहिती उपलब्ध करून देण्याचे दृष्टिने हा प्रयत्न दिसून येतो. प्रथम अपीलाचे संदर्भात जो निर्णय पारित केलेला आहे त्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करून देण्याचे दृष्टिने अर्जदारास संपूर्ण नस्तीतील कागदपत्रे उपलब्ध करून देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील सुध्दा हे प्रथम अपीलाचे निणर्याचे विरूध्द नाही व त्यामुळे पुढील कार्यवाही ही कागदपत्रामध्ये दिसून येत नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक 27.10.2005 च्या अर्जाप्रमाणे त्यांना एलएक्यू 47/8/1973–74 केसची कागदपत्रे त्यांना पाहणी करून त्यांचे संबंधित कागदपत्रांची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करून द्यावीत.

2) अपीलकर्ता यांनी सदरच्या नस्तीची तपासणी करण्याकरिता जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आतं तारीख व वेळ कळविण्यात यावी.

3) अपीलकर्ता यांना नस्तीची पाहणी करण्याकरिता अपीलकर्ता यांनी कळविलेल्या तारखेस व वेळेस सोबत त्यांचे वकील यांना परवानगी देण्यात यावी व त्यांचे संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करून घेतल्या नंतर स्वतंत्रपणे पोच द्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर.

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

दिनांक 13.3.2008